महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन ज्ञापन क्रमांक : पोप्रमा-१०१७/प्र.क्र.५१७/पोल-७.

मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १७ नोव्हेंबर, २०१७.

विषय :- पोलीस अधीक्षक, नांदेड, यांच्या अधिकारक्षेत्रातील उपविभागीय पोलीस अधिकारी, बिलोली, जिल्हा-नांदेड, याचे कार्यालय व निवासस्थान यांच्या सभोवती कुंपण भिंत बांधण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

संदर्भ :- १) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१४/ प्र.क्र.४९/ १४/ विनियम, दिनांक ०५.०१.२०१५.
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५.
३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांचे पत्र क्र. पोमसं/ २७-बी/ २८-बी-२/ नांदेड-उविपोअ-बिलोली-सं.-भिंत/ २३८/२०१७, दिनांक ०७.०९.२०१७.

ज्ञापन.-

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांनी पोलीस अधीक्षक, नांदेड, यांच्या अधिकारक्षेत्रातील उपविभागीय पोलीस अधिकारी, बिलोली, जिल्हा-नांदेड, याचे कार्यालय व निवासस्थान यांच्या सभोवती कुंपण भिंत बांधण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे.

२. उक्त कामासाठी उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, बिलोली, यांनी सन २०१७-१८ च्या जिल्हा दरसूचीनुसार तयार केलेले रु.४०,२०,०००/- इतक्या खर्चाचे अंदाज सादर केले आहेत. हे खर्चाचे अंदाज, (१) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, देगलूर, आणि (२) पोलीस अधीक्षक, नांदेड, यांनी साक्षांकित केले आहेत.

३. उक्त खर्चाचे अंदाज हे सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी तपासले आहेत व ते **रु.४६,१७,११७/-** असे सुधारित केले आहेत आणि, उक्त कामाचा खर्च हा गृह विभागाकडे उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा, या अटीवर प्रशासकीय मान्यता देण्यास सहमती दिली आहे.

४. त्या अनुसार, पोलीस अधीक्षक, नांदेड, यांच्या अधिकारक्षेत्रातील उपविभागीय पोलीस अधिकारी, बिलोली, जिल्हा-नांदेड, याचे कार्यालय व निवासस्थान यांच्या सभोवती कुंपण भिंत बांधण्यासाठी **रु.४६,१७,११७/-** इतक्या खर्चाच्या अंदाजास, निधी उपलब्ध झाल्याशिवाय बांधकामास सुरवात करु नये या अटीवर, याद्वारे, प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

५. उक्त कामासाठी येणारा खर्च हा गृह विभाग--मागणी क्रमांक बी-१०, ४०७०, इतर प्रशासनिक सेवांवरील भांडवली खर्च, (००) ८००, इतर खर्च, (००)(११) महाराष्ट्र राज्य पोलीस

गृहनिर्माण पोलीस विभागाच्या कार्यालयीन इमारतीचे बांधकाम करणे, (४०७० ०२११), ५३, मोठी बांधकामे, याखाली उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

६. हे ज्ञापन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.७१६/इमा-२, दिनांक १६.१०.२०१७, अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७. हे शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०१७१११७१८२१५२५४२९ असा आहे. हे ज्ञापन डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swapnil Gopal Borse

Digitally signed by Swapnil Gopal Borse
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=66835707253ff77ef0e333eb3ad582f9b876d443b2654088832e43dcad21c52a, cn=Swapnil Gopal Borse
Date: 2017.11.17 18:25:35 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) विशेष पोलीस महानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र, नांदेड.
३) पोलीस अधीक्षक, नांदेड.

प्रत :-

१) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, देगलूर, जिल्हा-नांदेड (*सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी दिलेल्या "Recapitulation Sheet" च्या प्रतीसह).*
२) जिल्हा कोषागार अधिकारी, नांदेड.
३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
४) कार्यासन अधिकारी (इमा-२), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) कार्यासन अधिकारी, वित्त विभाग (व्यय-७), मंत्रालय, मुंबई.
६) निवड फाईल (पोल-७).